प्रेसनोट दि.10.04.2024

निजामपुरा पोलीस ठाणे – दरोडयाची तयारी

निजामपुरा पोलीस ठाणे चे पोलीसांना मिळालेल्या माहितीवरून, पोउपनि/गिते, पोशि/1356 शेख व त्यांचे पथकाने दि.09.04.2024 रोजी पहाटे 05.25 वा. चे सुमारास तळवळी नाका ते कांबा रोड, तळयाच्या शेजारी, भिवंडी येथे सापळा रचुन तेथे आरोपी क्र.1)नईम जमाल अहमद सयद, वय 19 वर्षे, रा.नागाव रोड, भिवंडी 2) सुफियान भद्रेआलम अन्सारी, वय 19 वर्षे, रा.नागाव रोड, भिवंडी 3) सोहेल सनाउल्ला शेख, वय 26 वर्षे, रा.चव्हाण कॉलनी, भिवंडी यांना शिताफीने ताब्यात घेतले असता, त्यादरम्यान त्यांचे इतर दोन साथीदार फरार झाले आहे. ताब्यात घेतलेल्या आरोपींकडे अधिक चौकशी केली असता, ते सदर परिसरात दरोडा टाकण्याचे तयारीत असल्याचे समजले. सदर आरोपींकडुन ऑटो रिक्षा क्रं. MH 04-KX-7163, एक स्टील बॉडी असेलेले देशी बनावटीचे रिव्हॉल्वर, एक जिवंत राउंड, मिरचीपुड, एक देशी बनावटीची स्टीलची एअर गन, एक लोखंडी फायटर, एक चाकु, नायलॉनची रस्सी, एक लोखंडी रॉड, तीन मोबाईल फोन असे प्राणघातक हत्यारे व साहित्य जप्त करण्यात आले आहे. सदर प्रकाराबाबत सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरून आरोपींविरुध्द गुन्हा रजि. क्र. I 462/2024 भा.द.वि.कलम 399,402 सह भारतीय हत्यार कायदा कलम 3,25 सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 37(1),135 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन, आरोपी क्र.1 ते 3 अटक यांना करण्यात आली आहे. व इतर दोन फरारी आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि/अमित गिते हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी,

पोलीस आयुक्तालय,

ठाणे शहर